# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मौजे पानीव (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथील माजी सरपंचानी केलेला गैरव्यवहार**

**(१) ३५७७७ (२०-०१-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पानीव (ता.माळशिरस जि.सोलापूर) येथील जमीन गट नं ११०/२ पैकि १ हेक्टर २१ आर ही संपूर्ण जमीन ग्रामपंचायत पानीव यांच्या मालकीची असतांना माजी सरपंचानी आपल्या पदाचा गैरवापर करून श्री राम शिक्षण संस्था टेंभूरणी यांच्या नावे बक्षिसपत्र करून देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार श्री राम शिक्षण संस्थेवर व पदाधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-११-२०१८) :**(१) होय, हे अंशत: खरे आहे.
पानीव येथील ग्रामस्थ श्री दादा नामदेव डोंबाळे यांनी त्यांच्या मालकिची १ हेक्टर २१ आर जमीन दिनांक २६/०३/९९ च्या नोंदणीकृत बक्षीस पत्राद्वारे ग्रामपंचायत, पावीव यांना शाळेचे बांधकाम करण्याच्या उद्देशाने दिली. सदर जमीन ग्रामपंचायत पानीव यांनी ग्रामसभा दि. १८/०५/२००० व मासिक सभा दिनांक २८/०५/२००० मधील ठरावानुसार श्रीराम शिक्षण संस्था, टेंभूर्णी यांचे नावे नोंदणीकृत बक्षीसपत्र करून दिली. ग्रामपंचायत बक्षीस पत्रास प्राप्त झालेली सदर १ हे. २१ आर जमीन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांची पूर्व परवानगी न घेता बक्षीसपत्राने श्रीराम शिक्षण संस्थेस दिल्याबाबत झालेली अनियमितता ही अनाहूतपणे व कायद्यातील तरतुदींची माहिती नसल्यामुळे घडल्याचे ग्रामपंचायत, पानीव यांचे सरपंच यांनी मान्य केले आहे.

एकूण १ हेक्टर २१ आर जागांपैकी ०.२० आर जमीन पुन:श्च श्रीराम शिक्षण संस्था टेंभूर्णी यांनी ग्रामपंचायत पानीव यांना बक्षीपत्राद्वारे परत दिली आहे. उर्वरित १ हे ०.१ आर या जमितीवर श्रीराम शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक इमारती आहेत.

(२) श्रीराम शिक्षण संस्था टेंभुर्णी यांना बक्षीसपत्राने जमीन दिल्याप्रकरणी वारंवार तक्रारी प्राप्त होत असल्याने, सदरच्या विषयावर कायमस्वरुपी तोडगा काढण्याच्या अनुषंगाने दि. २६/३/१९९९ च्या बक्षीसपत्रानुसार ग्रामपंचायतीस मिळालेल्या १ हे २१ आर क्षेत्राच्या मुल्यांकनापेक्षा ग्रामपंचायतीस मिळण्या-या क्षेत्राची किंमत त्या वर्षाच्या किंमतीपेक्षा कमी नसेल अशा किमतीचे १ हे २१ आर क्षेत्र गावालगत श्रीराम शिक्षण संस्थेने ग्रामपंचायतीस स्वखर्चाने बक्षीसपत्राने द्यावयाचे. शिवाय २० आर क्षेत्रातील वाचनालय, व्यायामशाळा इमारतीच्या बदल्यात चालू आर्थिक वर्षातील DSR च्या दराप्रमाणे बांधकामाच्या होणा-या मुल्यांकनाप्रमाणे आजपर्यंत दिलेल्या भाडयाची रक्कम वजा करून ग्रामपंचायतीस अदा करावयाची जेणेकरून संस्थेच्या नावे असलेली गट क्र. ११०/२ मधील १ हे ०१ आर व वाचनालय, व्यायामशाळा इमारतीसह २० आर जागा संस्थेच्या नावे करता येतील. सदरच्या मोबदल्यातून ग्रामपंचायतीस प्राप्त झालेल्या रकमेतून आवश्यक ती विकास कामे करमा येतील. त्याशिवाय श्रीराम शिक्षण संस्थेच्या कार्यात अडथळा येणार नाही. असा प्रस्ताव मासिक सभा दि. १७/११/२०१७ ठराव क्र.५ व ग्रामसभा दि. १८/११/२०१७ ठराव क्र.३ अन्वये ठरविण्यात आले. तद्नुसार प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडून शासनास पाठविण्यात आला.

ग्रामपंचायतीने ग्रामसभेच्या मुजूरीने सादर केलेलल्या सदर प्रस्तावावर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील कलम ५५ नुसार निर्णय घेण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर हे सक्षम असल्याने तसेच निर्णय घेताना १ हे. २१ आर अतिक्रमणमुक्त जमीन त्यामधील साहित्यासह ग्रामपंचायतीस मिळावी, व्यायामशाळा व वाचनालय बांधण्यास ग्रामपंचायतीस जो काही खर्च लागेल तो श्रीराम शिक्षण संस्थेने ग्रामपंचायतीस द्यावा. सदर निर्णय घेताना कायद्याच्या अधिन राहून विद्यार्थ्यांचे नुकसान टाळून ग्रामपंचायतीचे नुकसान होऊ नये याची काळजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी असे शासन मान्यतेने मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., सोलापूर यांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

**राज्यात " थॅलेसेमियाग्रस्त " रुग्णांमध्ये होत असलेली वाढ**

**(२) ५४२७५ (३०-०८-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप**

**(श्रीगोंदा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.योगेश सागर (चारकोप), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात " थॅलेसेमियाग्रस्त " रुग्णांमध्ये वाढ होत असून यातील चाळीस टक्क्यांहून अधिक रुग्ण एकटया मुंबई शहरात आढळून आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-१०-२०१८) :**(१) राज्यात थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांमध्ये दरवर्षी वाढ होत आहे मात्र ४० टक्क्याहून अधिक रुग्ण हे मुंबईत आहेत, हे खरे नाही.

(२) व (३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्र राज्यात जिल्हा रुग्णालय, ठाणे, नाशिक, सातारा, अमरावती या चार ठिकाणी डे केयर सेंटर अंतर्गत हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकलसेल, ॲनिमिया या आजारांचे निदान, उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येतात. या व्यतिरिक्त केईएम रुग्णालय, मुंबई तसेच बी.जे वैद्यकिय महाविद्यालय,पुणे येथे उपचाराची सोय उपलब्ध आहे. उपचारांबरोबरच रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना कौन्सिलिंग करण्यात येते.

२०१६-१७ च्या PIP मध्ये जिल्हा रुग्णालय, अहमदनगर, पुणे, नागपूर, औरंगाबाद हे केंद्र मंजूर करण्यात आली आहेत. जिल्हा रुग्णालय ठाणे, नाशिक, सातारा आणि अमरावती येथे गरोदर मातांची व बालकांची चाचणी करण्यात येते. राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमाअंतर्गत Free Diagnostic सेवे मध्ये थॅलेसेमिया आजाराच्या चाचणीचा समावेश व जनतेत जनजागृती निर्माण करण्याची तरतूद राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हयातील रमेश ड्रायव्हिंग स्कुलच्या मालकाने शासनाच्या मोटार वाहन प्रशिक्षण योजनेंतर्गत केलेला गैरव्यवहार

**(३) ८८०३२ (२२-०८-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यातील रमेश ड्रायव्हिंग स्कुलच्या मालकाने शासनाच्या मोटार वाहन प्रशिक्षण योजनेंतर्गत सन २००८ ते सन २०१५ या कालावधीत विमुक्त जाती-जमाती, मागासवर्गीयांच्या निधीतून रु.१४५ कोटींचा गैरव्यवहार व अनियमितता केल्याची तक्रार नाथ फाऊंडेशन, जळगांव यांनी दिनांक ११ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, जळगांव यांच्याकडे केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१९-१०-२०१८) :** (१) होय (२), (३) व (४) या प्रकरणाची बार्टी, पुणे मार्फत तपासणी सुरु असून तपासणीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

**अमरावतीमधील बागाजी सागर पर्यटन स्थळ ठिकाणच्या विविध आवश्यक कामांचा परिपूर्ण प्रस्ताव प्रादेशिक पर्यटन विकास योजनेंतर्गत सादर करण्याबाबत**

**(४) ८८९०७ (१२-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावतीमधील बागाजी सागर पर्यटन स्थळ ठिकाणच्या विविध आवश्यक कामांचा परिपूर्ण प्रस्ताव प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत शासनाला सादर करावा यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक १६ जानेवारी,२०१७ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा यांना लेखी पत्रान्वये कळविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२२-११-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) सदर पत्राच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव शासनास अद्याप अप्राप्त असून, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अद्ययावत दरसूचीनुसार प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

---

**औरंगाबाद येथील घाटी या शासकीय रुग्णालयात स्ट्रेचर न मिळाल्याने महिलेची प्रसूती पायरीवरच होण्याच्या घटनेबाबत.**

**(५) ९१४२७ (२१-०८-२०१७). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)औरंगाबाद येथील घाटी या शासकीय रुग्णालयात दिनांक १५ जून रोजी पहाटे सुमारे ३.४५ वाजता एक गरोदर महिला अपघात विभागा समोर प्रसूतीसाठी पोहोचली पण बराच वेळ वाट पाहूनही स्ट्रेचर न आल्यामुळे सदर महिलेची प्रसूती पायरीवरच झाली सामाजिक कार्यकर्त्यांनी पडदे उभे करून मदत केली परंतु सदर प्रक्रिया सुरु असताना एक सी.एम.ओ.दोन परीचारिका व एक शिपाई यांनी समोर उभे राहून बघ्याची भूमिका घेतली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापूर्वी देखील पाय मोडलेल्या रुग्णास स्ट्रेचर देण्याची जबाबदारी माझी नाही असे सी एम ओ नी सांगितल्यावरून सदर रुग्णास पाय घासत जावे लागले तसेच काही दिवसा पूर्वी ६० वर्षीय महिलेस पहाटे २ वाजता छातीत दुखण्यामुळे रुग्णालयात आणल्यावर बराच वेळ स्ट्रेचर न मिळाल्याने तिला फरफटत नेऊन पलंगावर झोपवताच २ मिनिटात सदर महिलेचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास या घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (११-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) लागू नाही.

---

**औरंगाबाद शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील वाहनतळाच्या निविदेबाबत**

**(६) ९३३१५ (२१-०८-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील वाहनतळासाठी सन २०१७-१८ वर्षासाठी प्रशासनाने दिनांक ६ मे २०१७ रोजी निविदा काढल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निविदा प्रक्रियेत येथील अधिक्षक व मुख्यप्रशासक यांनी गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबधित अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच नव्याने निविदा प्रक्रिया राबवून पारदर्शक पध्दतीने या वाहनतळाचा कंत्राट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (११-१०-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) लागू नाही.

---

**सेनगाव (जि. हिंगोली) तालुक्यात गोठा बांधण्याच्या योजनेंतर्गत शेतक-यांना गोठा मिळण्याबाबत**

**(७) ९७२८४ (२२-१२-२०१७). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेनगाव (जि. हिंगोली) तालुक्यात गुरासाठी गोठा बांधण्याच्या योजनेंतर्गत गोठा मिळण्यासाठी अनेक शेतक-यांनी दिलेले गोठयाचे अर्ज दाखल करुन तीन ते चार महिने झाले असून अद्यापही त्या शेतक-यांना गोठा मिळाला नसल्याचे माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोठयाचा प्रस्ताव मंजुर करण्यासाठी शेतक-यांना पंचायत समिती कार्यालयात वारंवार भेट दयावी लागत असल्यांमुळे शेतक-यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदर ठिकाणी शेतक-यांना तात्काळ गोठा मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१८) :** (१) होय. हे अंशत: खरे आहे.
पंचायत समिती, सेनगांव येथे माहे डिसेंबर, २०१६ ते माहे फेब्रुवारी, २०१७ या कालावधीमध्ये एकूण ४३६ गुरांच्या गोठ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. गुरांच्या गोठ्यांच्या कामाचे अकुशल व कुशल प्रमाण अंदाजपत्रकानुसार १४:८६ आहे. सदर कामामध्ये कुशल प्रमाण जास्त असून अकुशल प्रमाण कमी आहे. जिल्हा स्तरावर अकुशल व कुशल (६०:४०) चे प्रमाण गरजेचे आहे. ते राखण्याकरिता अकुशल प्रमाण जास्त असलेली कामे प्राथम्याने हाती घेतली जातात.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा बोरखेडी (फा) नागपुर येथील उपकेंद्र बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(८) १०१२५० (०४-०१-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा बोरखेडी (फा) नागपुर येथील उपकेंद्र बांधकामासाठी जागा तात्काळ उपलब्ध करुन देण्याकरीता आवश्यक कार्यवाही करण्याबाबत लोकप्रतिनिधी, हिंगणा यांनी मा. उपविभागीय अधिकारी, नागपुर (ग्रा) यांना दिनांक २५ जुलै,२०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-१०-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) मौजा बोरखेडी (फा) नागपुर येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्र बांधकामासाठी जिल्हा परिषद नागपूर यांच्याकडे जागा हस्तांतरीत करण्याबाबत अंतिम आदेश दि.२२.०२.२०१८ रोजी निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेतक-यांच्या कर्जमाफीची रक्कम उभारण्यासाठी परभणी जिल्हा नियोजन समितीचा २१ कोटी ६३ लाख ३६ हजार रुपयांचा निधी कपात केल्याबाबत**

**(९) १०२१३० (१३-०७-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची रक्कम उभारण्यासाठी परभणी जिल्हा नियोजन समितीचा २१ कोटी ६३ लाख ३६ हजार रुपयांचा निधी कपात करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जमाफीसाठी जिल्हा नियोजनचा निधी कपात करण्यात आल्यामुळे जिल्ह्यातील विकास कामे प्रलंबित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील विकास कामे पूर्ण होण्यासाठी सदर निधी कपात करण्याचा निर्णय मागे घेण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-११-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत परभणी जिल्ह्यासाठी सन २०१८-१९ या वर्षात रु. १५२२९.०० लक्ष इतका नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सन २०१७-१८ मध्ये परभणी जिल्ह्याकरीता रु. १४४४६.०० लक्ष इतका नियतव्यय उपलब्ध झाला होता. सन २०१८-१९ साठी त्यामध्ये ५.४३ % वाढ झालेली असून वित्त विभागाचे शासन परिपत्रक, क्र.

अर्थसंकल्प-२०१८/प्र.क्र. ६९/अर्थ-३, दि. ०२/०४/२०१८ च्या आदेशान्वये अद्यापपर्यंत रु. १२०५८.४५ लक्ष इतका निधी वितरीत केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील शासकीय कर्करोग रुग्णालयात कंत्राटद्वारामार्फत कर्मचाऱ्याची पिळवणूक होत असल्याबाबत**

**(१०) १०२७३० (२७-१२-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील शासकीय कर्करोग रुग्णालयात कंत्राटद्वारामार्फत भरण्यात आलेल्या कर्मचाऱ्याना मूळवेतन ७ हजार ५०० रुपये असतांना कर्मचाऱ्याना फक्त २००० रुपये देण्यात येतात, हे खरे आहे काय
(२) असल्यास, या संदर्भात कर्मचाऱ्यानी वारंवार तक्रार दाखल करूनही कंत्राटदारा विरुद्द कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय
(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधित कंत्राटदारावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (२६-०९-२०१८) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) लागू नाही.

---

**चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील रायगड रीवर प्रोजेक्ट आणि दर्यापूर येथील वाघाडी सिंचन प्रकल्पाच्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(११) १०५२१४ (१२-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :**
सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील चांदूर रेल्वे येथील रायगड रीवर प्रोजेक्ट आणि दर्यापूर येथील वाघाडी सिंचन प्रकल्पाच्या कामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पांसाठी आगाऊ रक्कम दिलेली असतांनाही प्रकल्पांचे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-१०-२०१८) : (**१) नाही.
(२) सदर प्रकल्पांच्या बांधकामांच्या करारनाम्यात कंत्राटदारास कुठलीही आगाऊ रक्कम प्रदान करण्यात आलेली नाही. प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून जून, २०२० पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) रायगड व वाघाडी प्रकल्पांबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्र.१७२/२०१६-१७ व १७३/२०१६-१७ दाखल असून सदर प्रकल्पाची ACB मार्फत चौकशी सुरु आहे. याप्रकरणी उक्त दोन्ही प्रकल्पांच्या बांधकामामध्ये काहीही गैरव्यवहार झालेला नाही. मात्र निविदा घेण्यास्तव संबंधित कंत्राटदाराने खोटी कागदपत्रे दाखल केल्यामुळे आर्थिक गुन्हे शाखा, अमरावती (ग्रामीण) यांचेकडून संबंधित कंत्राटदारावर गुन्हा दाखल झाला आहे. तसेच सदरची चौकशी अधीक्षक अभियंता तथा परिमंडळीय अधिकारी, दक्षता पथक अमरावती यांचेकडून सुध्दा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माँ जिजाऊंच्या जन्मस्थळाने पुनित सिंदखेडराजा मातृतिर्थाच्या विकास आराखडयाची घोषणा केल्याबाबत**

**(१२) १०५२३४ (१८-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माँ जिजाऊंच्या जन्मस्थळाने पुनित सिंदखेडराजा मातृतिर्थाच्या विकास आराखडयाची घोषणा होऊन तीन वर्षे होत आले तरी प्रशासकीय मान्यता अद्याप मिळाली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पहिल्या टप्प्यातील २५ कोटीच्या कामांना मंजुरी देवूनही दोन वर्षात आराखडयांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश मा. मुख्यमंत्र्यांनी १२ जानेवारी, २०१५ ला दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने विकास आराखडयाची कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) दिनांक ३१.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सिंदखेडराजा, जि.बुलडाणा येथील राजामाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा पर्यटन विकास आराखड्यास मान्यता दिलेली आहे.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १२.१.२०१५ रोजी सिंदखेडराजा येथे जिजाऊ जन्मोत्सव कार्यक्रमात जिजाऊ सृष्टी निर्माण करण्याबाबत घोषणा केली होती.

त्यानुसार दिनांक ३१.३.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रुपये २५.०० कोटी किंमतीच्या राजमाता जिजाऊ जन्मस्थळ सिंदखेडराजा, जि.बुलडाणा पर्यटन विकास आराखड्यास मान्यता देऊन रुपये २.०० कोटी निधी जिल्हाधिकारी, बुलडाणा यांना वितरीत केलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोकणाची पाणी साठवणूक क्षमता ७ टक्के असून जल साठवणूकीच्या प्रस्तावाबाबत**

**(१३) १०६४४९ (०९-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :**

सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणाची पाणी साठवणूक क्षमता ७ टक्के असून जलसाठवणूकीचा प्रस्ताव गेल्या एक वर्षापासून शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जल साठवणूकीबाबत कोकणात लहान मोठे मध्यम आणि साखळी पध्दतीचे बंधारे बांधण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपायोजना केली आहे,

(३) असल्यास, उक्त बंधारे कोणकोणत्या ठिकाणी बांधण्यात येणार आहे व सदरच्या बंधा-यास अंदाजे खर्च किती येणार आहे,

(४) असल्यास, उक्त योजना तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-१०-२०१८) :** (१) पश्चिम वाहिनी नदी खोऱ्याच्या एकात्मिक जलनिष्पती अभ्यासानुसार कोकणात ७५% विश्वासार्हतेने २२६८ अ.घ.फू. पाणी उपलब्ध असून सन-२०३० पर्यंत कोकणातील सिंचन, बिगरसिंचन तसेच इतर खोऱ्यात वळविण्यासाठी प्रस्तावित पाणीवापरासह एकूण पाण्याची गरज ४४१ अ.घ.फू. इतकी होईल जी उपलब्ध पाण्याच्या सुमारे १९% इतकी आहे.

(२) जलसंपदा विभागामार्फत ५६ मोठे, मध्यम व लघुप्रकल्पाचे कामे प्रगतीपथावर असून प्रदेशांतर्गत जल साठवणूकीसाठी नवीन कोणत्याही प्रकारचे बंधारे प्रस्तावित नाहीत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिरण्यकेशी नदीवर (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) बेकायदेशीररित्या पाण्याचा उपसा होत असल्याबाबत**

**(१४) १०७१६९ (१३-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिरण्यकेशी नदीवर (ता.गडहिंग्लज,जि.कोल्हापूर) कर्नाटक सरकारने बांधलेल्या नदीपात्रातील बांधलेल्या पुलाची व त्यातून बेकायदेशीररित्या पाण्याच्या होत असलेल्या उपशामुळे खानदाळ, नांगनूर, अरळगुंडी, कडलगे, हिरणी गावच्या ग्रामस्थानी गडहिंग्लज प्राताधिकारी यांचेकडे दिनांक २१ नोव्हेंबर,२०१७ रोजी वा त्यासुमारास चौकशी करण्याचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार कर्नाटक सरकारने नदीपात्रात बेकायदेशीर बांधलेला पूल व विनापरवाना सुरु केलेला पाणी उपसा बंद करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

याबाबत मा.खासदार श्री.धनंजय महाडिक यांनी दिनांक १४/११/२०१७ रोजी या कार्यालयास व उपविभागीय अधिकारी, (प्रांताधिकारी) गडहिंग्लज यांना पत्र दिलेले आहे. याबाबतचा अहवाल खासदार महोदयांना सादर केला आहे.

(२) कर्नाटक शासनामार्फत संकेश्वर-नांगनूर दरम्यानच्या पूलामध्ये माहे ऑगष्ट २०१७ मध्ये बरगे घालून पाणी अडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तथापि, या मंडळांतर्गत क्षेत्रीय अधिका-यांनी प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर जाऊन अटकाव केल्यामुळे पाणी अडविण्यात आलेले नाही.

(३) सदर पूलाचे बांधकामाच्या सहमतीसाठी या मंडळाकडे कर्नाटक शासनाकडून कोणत्याही प्रकारे पत्रव्यवहार करण्यात आलेला नाही. कर्नाटक शासनाच्या गोटूर बंधा-यात अडविलेले पाणी तलाव पुनर्भरणासाठी उपसा न करण्याबाबत व पूल बांधकामाच्या सहमती विषयीची कागदपत्रे या कार्यालयास उपलब्ध करून देणेबाबत क्षेत्रीय अधिका-यांनी कर्नाटक शासनाच्या जलसंपदा विभागास कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे तेवूरवाडी (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) या लाभक्षेत्राबाहेरील गावांला घटप्रभा नदीतून तारेवाडी बंधाऱ्यातून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी मिळणेबाबत**

**(१५) १०७२३० (१०-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तेवूरवाडी (ता.चंदगड,जि.कोल्हापूर) या लाभक्षेत्राबाहेरील गावाला घटप्रभा नदीतून तारेवाडी बंधाऱ्यातून पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक २८ डिसेंबर,२०१७ रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,त्यानुसार शेतकऱ्यांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :**(१) होय.

(२) तेऊरवाडी गाव घटप्रभा मध्यम प्रकल्पाच्या लाभक्षेत्राबाहेर येते. तेऊरवाडी ग्रामस्थांकडून शेतीसाठी अथवा पिण्यासाठी घटप्रभा नदीतून पाण्याची रीतसर मागणी अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची उद्दिष्टे अपूर्ण असल्याबाबत**

**(१६) १०७८१६ (२८-०३-२०१८). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :**

सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या आर्थिक स्तर उंचावण्याकरीता दरवर्षी निधीची तरतुद करूनही यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेची उद्दिष्टे अपूर्ण असल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाजासाठी शासनाकडून विविध योजना राबविण्यात येत असून त्याकरीता दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये ५ ते १० कोटीच्या निधीची तरतुद करण्यात येते परंतु मागील सहा वर्षात निधीची तरतुद करूनही समाज कल्याण विभागाबरोबरच वन, महसूल, गृहनिर्माण, ग्रामविकास, नियोजन आणि वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे उद्दिष्टे अपूर्ण राहिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, योजनेची उद्दिष्टे गाठण्याकरीता जिल्हा स्तरावर समिती गठीत करावयाची असतांना काही जिल्हयात समिती गठीत झाली नसून तर काही जिल्हयात साधे सर्वेक्षण सुध्दा झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार योजनेकरीता दरवर्षी निधीची तरतुद करूनही उद्दिष्टे पूर्ण करण्यास दुर्लक्ष करणाऱ्या विभागांच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२६-१०-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) शासनाने दिनांक २७/१२/२०१४ च्या शासन निर्णयान्वये विमुक्त जाती,भटक्या जमातीच्या लोकांचे राहणीमान उंचावणे व त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढून त्यांना विकासाच्या मुळ प्रवाहात येता यावे यासाठी ग्रामीण भागात यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना सुरु केली आहे. या योजनेमध्ये सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये निधीची तरतुद करुनही फारसा प्रतिसाद मिळाला नाही ही बाब लक्षात आल्यामुळे दिनांक २४/१/२०१८ च्या शासन निर्णयान्वये सदर योजना सुधारीत केली आहे. योजना सुधारीत केल्यामुळे या योजनेला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकूण ५ वसाहतीला मान्यता देण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये या योजनेसाठी उपलब्ध झालेली तरतुद पुर्णपणे खर्च झाली आहे.
सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी या योजनेकरीता रु. ४०.०० कोटी एवढी तरतुद अर्थसंकल्पीत करण्यात आलेली आहे.

---

**मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटूंबाना आश्रय देण्यासाठी करावयाच्या उपाययोजना**

**(१७) १०८६९९ (०७-०४-२०१८). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सततच्या दुष्काळाने मराठवाडयातील अनेक शेतकऱ्यांनी जीवन संपविले असुन कुटूंबाचा उदरनिर्वाह, मुला-मुलींचे शिक्षण यात भरडल्या जाणाऱ्या कुटूंबातील अनेकांनी आश्रमांकडे धाव घेतली असुन यापैकी राज्यातील १४७७ विद्यार्थ्यांची प्रतीक्षा यादी असुन आधारतीर्थ आश्रमाकडे असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू आश्रमाकडे एवढया विदयार्थ्यांना सांभाळण्याची क्षमता नसल्याने ५६१ मुलांचा घरासाठी शोध सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (२९-१०-२०१८) :** (१), (२), (३) व (४) प्रकरण तपासण्यात येत आहे.

---

**महिंद (ता.पाटण,जि.सातारा) येथील प्रकल्पातंर्गत बाधित मौजे चौगुलेवाडी येथील नागरी सुविधांच्या कामांना निधी देण्याबाबत**

**(१८) १०८७६९ (२८-०३-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) : दिनांक २५ जुलै, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३०६ मधील प्रश्न क्रमांक ६५४१२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिंद (ता.पाटण,जि.सातारा) येथे कृष्णा खोरे विकास महामंडळातंर्गत लघू पाटबंधारे तलाव प्रकल्प साकारण्यात आला असून या प्रकल्पामुळे अंशत: बाधित झालेल्या बोर्गेवाडी गांवाचे मौजे चौगुलेवाडी येथे पुनर्वसन करण्यात येत आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गांवाचे पुनर्वसन करताना बोर्गेवाडी प्रकल्पग्रस्तांना गावठाण देताना सन २००१-०२ मध्ये नागरी सुविद्यांची कामे पुर्ण करण्यात आली होती परंतु या ठिकाणी पाण्याची सोय नसल्याने प्रकल्पग्रस्त इथे स्थलांतरीत झाले नसल्यामुळे येथे देण्यात आलेल्या नागरी सुविधांची मोडतोड झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोडतोड झालेल्या नागरी सुविधांची कामे करुन प्रकल्पग्रस्तांना स्थलांतरीत करण्यात मदत व्हावी याकरीता दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सातारा पाटबंधारे विभागाकडे पत्रव्यवहार केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी या नागरी सुविधांच्या कामाकरीता शासनाकडून सुमारे २३ लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध व्हावा याकरीता शासनाकडे कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचेमार्फत प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) नाही. नागरी सुविधा दुरुस्ती करिता रु.२१.९२ लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचे पत्र क्र.म.कृ.खो.वि.मं./२८/(६७१/२०१६)/ प्रशा-५/४७५० दि.६/१२/२०१६ अन्वये काही अटींच्या अधीन राहून सर्वसाधारण मंजुरी देण्यात आलेली आहे.

(५) सदर प्रस्तावास महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ,पुणे यांचेकडून मंजूरी देण्यात आलेली आहे. नागरी सुविधांच्या दुरुस्तीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्रापासून सवलत मिळण्याबाबत**

**(१९) १०९५४२ (०७-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि नोकरीविषयक सवलतीसाठी नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र देण्याची आवश्यकता नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील भटक्या व विमुक्त जाती जमातीच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक आणि नोकरीविषयक सवलतीसाठी नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची सक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील भटक्या विमुक्त जाती जमातीचे बहुतेक लोक राज्य व परराज्यातील विविध भागात भ्रमंती करीत असल्यामुळे त्यांना अशा प्रकारची प्रमाणपत्रे कठीण असल्यामुळे त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१५-१०-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३), (४) व (५) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

---

**पंढरपूर-मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील बेरोजगार तरूणांना उद्योगासाठी असणारी मुद्रा योजना यामध्ये कर्ज नाकारणाऱ्या बँकाबाबत**

**(२०) १११११२८ (१९-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयातील बेरोजगार तरूणांकरीता उद्योगासाठी असणारी मुद्रा योजना यामध्ये कर्ज नाकारणाऱ्या सर्व राष्ट्रीयकृत, सहकारी, पतसंस्था आदी बँकांवर थेट कार्यवाही करण्याचा इशारा मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी दिला असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील हजारो तरूणांनी यापूर्वी बँकांकडे भरलेल्या कर्ज प्रकरणाच्या अर्जाप्रकरणी अद्यापपर्यंत कोणत्याही बँकांनी कर्ज पुरवठा केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्ज नाकारणाऱ्या बँकांवरती तसेच बेरोजगार तरुणांना

कर्ज मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०५-११-२०१८) :** (१) होय.
(२) नाही.

पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील एकूण ५२ बँकांनी प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेंतर्गत १८७८ लाभार्थ्यांना रुपये ३१.६७ कोटी रुपयाचे वाटप केलेले आहे. तसेच प्रधानमंत्री मुद्रा बँक योजनेमध्ये सोलापूर जिल्हा कर्जदारांच्या संख्येनुसार राज्यामध्ये प्रथम क्रमांकावर असून कर्ज वाटपाच्या रकमेनुसार तिसऱ्या क्रमांकावर आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोदावरी निधीमधून मराठवाड्यातील मांजरा खोऱ्यात व मन्याड खोऱ्यात पाणी टाकण्याचा प्रस्तावास मान्यता देण्याबाबत**

**(२१) १११८७० (२८-०३-२०१८). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोदावरी नदीवरून माजलगाव धरणातुन कुंडलिका धरणात वान खोरे मांजरा खोऱ्यात व मन्याड खोऱ्यात पाणी टाकण्याचा प्रस्ताव गोदावरी खोरे विकास महामंडळाने सन २००८-०९ मध्ये शासनाकडे दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावानुसार कामास किती खर्च अपेक्षित आहे व सदरची कामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) :**

(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भामा आसखेड प्रकल्पाचे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीचे झालेले बेकायदेशीर वाटप**

**(२२) ११३८५६ (१३-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाने भामा आसखेड प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यातील वडगाव बांडे पाटेठाण, टाकळीभिमा, पानवली, कोरेगांवभिवर, टेळेवाडी, राहू, पिलाणवाडी, देवकरवाडी, वाळकी व इतर काही गावांच्या जमिनी या संपादित केलेल्या असून या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूमिसंपादन करून त्या जमिनी गुंजवणी व इतर प्रकल्पांना बेकायदेशीर रित्या वापट केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावे लाभाक्षेत्रात समाविष्ट असल्याने या गावातील शेतकऱ्यांच्या जमिनीचे भूमिसंपादन करून इतर प्रकल्पांना बेकायदेशीर रित्या वाटप करण्यात आले आहे तसेच उक्त गावांतील प्रकल्पग्रस्तांना लाभाक्षेत्रातून वगळण्यात येऊ नये म्हणून स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २९ ऑगष्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे व यासंबधी बैठका देखील झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, MWRRA ने पुणे महानगर पालिकेस ८.५ TMC पाणी वापराचा बंधन घातले असताना त्याच्याकडे ११.५ TMC पाणी वापराचा अधिकृत परवाना असतना सदर गावांना बेकायदेशीररित्या भामा आसखेड प्रकल्पातून वगळून सदर पाणी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना आरक्षित करण्याची बेकायेशीर प्रक्रिया देखील सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,८.५ TMC पाणी वापरचे बंधन असून त्यांच्याकडे ११.५ TMC अधिकृत परवाना असताना देखील पुणे महानगर पालिका प्रत्यक्षात सुमारे १७ TMC पेक्षा जास्त पाणी वापर करते, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यासह उक्त गावांना लाभक्षेत्रातून वगळू नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) :**(१) भामा आसखेड प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यातील वडगाव बांडे पाटेठाण, टाकळीभिमा, पानवली, कोरंगाव, ठेळेवाडी, राहू, पिलाणवाडी, देवकरवाडी, वाळकी व इतर काही गावांच्या जमिनी महाराष्ट्र प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन अधिनियम-१९९९ मधील तरतुदीनुसार संपादित केल्या आहेत. विभागीय आयुक्त, पुणे, यांनी पुणे जिल्हयातील प्रकल्पग्रस्तांना भूखंड व जमिन वाटपाबाबत सविस्तर आराखडा पुस्तिका प्रसिध्द करुन सर्व क्षेत्रिय कार्यालयांना उपलब्ध करुन दिली आहे. त्यानुसार भामा आसखेड प्रकल्पांतर्गत दौंड तालुक्यातील राहू, पिलाणवाडी व वडगांवबांडे या गावातील संपादित जमिनी पुणे जिल्हयातील गुंजवणी प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांसाठी वाटप करणेत येत आहेत. त्यामुळे गुंजवणी व इतर प्रकल्पग्रस्तांना बेकायदेशीर सदर रित्या जमिनी वाटप केल्या आहेत, हे खरे नाही.

(२) उक्त गावातील जमिनी लाभक्षेत्रातून वगळणेत येऊ नये म्हणून स्थानिक लोकप्रतिनिधी व

स्थानिक लोकांची मागणी आहे.

(३) भामा आसखेड प्रकल्पाच्या एकूण प्रकल्पीय १८८.६११ द.ल.घ.मी. पाणी वापरापैकी १४१.४८ द.ल.घ.मी. पाणी पिण्याच्या वापरासाठी पुणे शहर, पिंपरी चिंचवड, चाकण व लगतची इतर १९ गावे यांच्या पिण्याच्या पाण्याकरिता आरक्षित केले आहे. बाष्पीभवन व्यय १५.०४ द.ल.घ.मी. व धरण जलाशयावरील उपसा सिंचनाखालील २२.३०५ द.ल.घ.मी.पाणी वापर विचारात घेता धरणाच्या खालील बाजूच्या सिंचनासाठी ९.७७९ द.ल.घ.मी. इतके पाणी शिल्लक राहते.

(४) होय.

(५) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने घरगुती पाणी वापरासाठी निर्धारित केलेल्या पाणी वापराच्या मर्यादेत राहून संबंधित महानगरपालिकेने पाणी वापर सिमित करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांकडून कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकलारा (ता.राळेगांव,जि.यवतमाळ) येथील पाणी वापर संस्थेने तलावाची दुरूस्ती केल्याचा निधी पाटबंधारे विभागाकडुन प्रलंबित असल्याबाबत**

**(२३) ११४०३३ (१३-०४-२०१८). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकलारा (ता.राळेगांव,जि.यवतमाळ) येथील गुरूदेव पाणी वापर संस्थेने एकलारा तलाव हा १०० टक्के पाण्याने भरलेला असतांना कालवा नादुरूस्त असल्यामुळे लाभ धारक शेतक-याच्या शेतातील पिकास पाण्याची अंत्यत आवश्यकता असल्याने पाणी वापर संस्थेने राळेगांव सिंचन शाखेचे अधिकारी यांना सांगुन नादुरूस्त कालव्याचे काम गाळ काढणे , कालवा साफसफाई करणे इत्यादी काम केले असल्याचे दिनांक ८ डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यानच्या निवेदनावरून दिसुन आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणी वापर संस्थने ५ कि.मी. पर्यत कालव्याचे गाळ काढणे साफसफाई करणे इत्यादी कामे करण्यात आली व कालव्याव्दारे शेतक-यांना पाणी देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबधित विभागाच्या अधिका-याने निधी देण्याचे आश्वासन दिले परंतु कुठलाही निधी पाणी वापर संस्थेने दिला नसल्याचे निवेदनावरून दिसुन आले,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार संबधित विभागाच्या अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२६-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास मंजूर देण्याबाबत**

**(२४) ११५८५६ (०५-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु व्हावे यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्यासाठी जिल्हयातील विविध क्षेत्रात काम करणा-या नागरिकांनी एक कृती समिती स्थापन केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंभीर अपघात अथवा आजार झाल्यास आधुनिक वैद्यकीय उपचार तसेच नेमके निदान तात्काळ होत नसल्याने दरवर्षी सिंधुदुर्ग जिल्हयात शेकडो नागरिकांचे मृत्यू होत असल्याने जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे या मागणीचे एक निवेदन दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास सदरहू कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व मा. मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे

(२) होय, हे ही खरे आहे

(३) सिंधूदूर्ग येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**पार - तापी - नर्मदा या नदी जोड प्रकल्पाऐवजी नार गिरणा व पार गोदावरी हे नदी जोड प्रकल्प राबविण्याबाबत**

**(२५) ११७०७३ (२०-०७-२०१८). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पार - तापी - नर्मदा या नदी जोड प्रकल्पास महाराष्ट्राची असहमती कळवावी अशी नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी दि १३ आक्टोबर २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री, जलसंपदा यांच्याकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नार -पार -औरंगा- अंबिका इ.खोऱ्यातील उपलब्ध पाणी तुटीच्या गिरणा व गोदावरी खोऱ्यात वळविण्याकरिता नार गिरणा व पार गोदावरी हे राष्ट्रीय नदी जोड प्रकल्प राबविण्याची नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे , हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) :** (१) होय,

(२) होय

(३) नार,पार, औरंगा, अंबिका इ. खोऱ्यातील उपलब्ध पाणी तुटीच्या गिरणा उपखोऱ्यात वळविण्यासाठी प्रस्तावित नार पार गिरणा जोड योजनेचा पूर्व व्यवहार्यता अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे. योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (Detailed DPR) तयार करण्यासाठी भारत सरकार अंगीकृत मे.वॅपकॉस इंडिया लि. नवी दिल्ली, यांचे सोबत करारनामा करण्यात आला आहे.

पार-गोदावरी जोड योजना (उपसा जोड योजना क्र.३ व ४ ता,पेठ, जि.नाशिक) या योजनेचे सर्वेक्षण सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम खाजगी अभिकरणा मार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या नीट परिक्षेच्या वेळी झालेले गैरव्यवस्थापन

**(२६) ११७३७७ (०१-०८-२०१८). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपळे सौदागर, (जि.पुणे) व शिवाजी विद्यालय (जि.बुलढाणा) येथे केद्रिंय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे(सीबीएसई) वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आलेल्या "नीट" या परिक्षेच्या वेळी परिक्षा केद्रावर विद्यार्थी ड्रेस कोडमध्ये नसल्याचे आढळल्याने विद्यार्थ्यांच्या शर्टच्या कॉलर व बाह्य कात्रीने कापून त्यांना परिक्षा कक्षात प्रवेश देण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकारामुळे विद्यार्थ्यांना परिक्षा कक्षात पोहचण्यास विलंब झाल्याने काही विद्यार्थ्यांना परिक्षेला बसू देण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास ,याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८) :** (१) अशी घटना घडल्याची माहिती प्राप्त झालेली नाही, असे सीबीएसई कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात ११ हजार १११ हेक्टर क्षेत्रावर फळबागा उभारण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(२७) ११८२७७ (२३-०७-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोजगार हमी योजनेतून राज्यात ११ हजार १११ हेक्टर क्षेत्रावर फळबागा उभारण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अंतर्गत नाशिक जिल्हयात फक्त १,६५२ प्रस्ताव दाखल झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना कशाप्रकारे राबविण्यात येणार आहे तसेच झाडांच्या संगोपनाबाबत शेतक-यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे काय ?

**श्री. जयकुमार रावल (३०-१०-२०१८) :** (१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या समृध्द महाराष्ट्र जनकल्याण योजनेअंतर्गत कल्पवृक्ष फळबाग लागवडीसाठी सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये १,११,१११ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवडीचे उदिष्ट देण्यात आले होते.

(२) नाशिक जिल्हयामध्ये सन २०१६-१७ व २०१७-१८ या दोन वर्षामध्ये फळबाग लागवडीसाठी १७४९ शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते.

(३) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवडीबाबत सविस्तर सुचना दि. १ ऑक्टोबर, २०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

सदर योजनेमध्ये लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना विविध प्रशिक्षणातून क्षेत्रिय स्तरावरुन मार्गदर्शन करण्यात येत आहे

---

**निरा देवघर प्रकल्प (ता.भोर, जि.पुणे) अंतर्गत वेनवडी उपसा जलसिंचन योजनेचे काम मुदतीत पूर्ण करण्याबाबत**

**(२८) ११९०८५ (२०-०७-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निरा देवघर प्रकल्प (ता.भोर, जि.पुणे) अंतर्गत वेनवडी उपसा जलीसिंचन योजनेचे काम मुदतीत पूर्ण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,

सिंचन भवन, पुणे यांना दिनांक २४ ऑगस्ट,२०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार वेनवडी उपसा जलसिंचन योजनेचे काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) : (**१) होय.

(२) जलसंपदा विभाग, शासन निर्णय दि.१३/०१/२०१७ अन्वये सिंचन प्रकल्पात नलिकेद्वारे पाण्याचे वितरण करण्याच्या धोरणानुसार निरा देवघर उजव्या कालव्याची ६६ कि.मी. पुढील कामे बंद नलिकेद्वारे करणेबाबतची उचित कार्यवाही महामंडळ स्तरावरुन करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**लोणवडी (ता.नांदुरा,जि.बुलढाणा) येथील लघुपाटबंधा-याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२९) ११९४०७ (२०-०७-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणवडी (ता.नांदुरा,जि.बुलढाणा) येथील लघुपाटबंधा-याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून सदर बाब चौकशी अहवालातून सिध्द होवूनही कंत्राटदारावर अद्याप कारवाई झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच लोणवडी येथील शेतक-यांना प्रकल्पाशेजारील नाला ओलांडून शेती करावी लागत असल्याने या नाल्यावर पुल बांधणे गरजेचे आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार लघुपाटबंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्यासह निधीची तरतूद करुन सदर ठिकाणी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) सदर प्रकरणी चौकशी होऊन निकृष्ट दर्जाची काही बांधकामे दुरुस्त करण्यात आली आहेत. उर्वरित बांधकामाबाबत चाचण्या घेण्याची कार्यवाही प्रगती पथावर असून चाचणी अहवाल प्राप्त झाल्यावर कार्यवाही करण्यात येईल.

शेतरस्ता (लांबी १८९० मी.) तसेच नाले येत असल्यामुळे दोन पूल देण्याबाब खडदगाव येथील नागरीकांनी विनंती केलेली आहे.पूल बांधकामाची अंदाजपत्रके तयार करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नीरा डाव्या कालव्यातून शेतीसाठी पाणी मिळाले नसल्याबाबत

**(३०) ११९६३५ (२४-०७-२०१८). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंपदा विभागाच्या गैरकारभारामुळे नीरा डाव्या कालव्यातून गेल्यावर्षी प्रमाणे या ही वर्षी वेळेवर शेतीसाठी पाणी मिळाले नाही, त्यामुळे पिके जळून कर्ज वाढले असल्याने इंदापूर (जि.पुणे) अर्बन बँकेचे संचालक तथा बेलवाडी येथील शेतकरी वसंत पवार यांनी दि.२१ एप्रिल, २०१८ रोजी विहीरीमध्ये उडी मारुन आत्महत्या केल्याचे प्रकरण निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी नीरा डाव्या कालव्याच्या ४२ आणि ४३ क्रमांकाच्या वितरिकेला दिनांक १७ आणि १९ एप्रिल, २०१८ रोजी पाणी सोडण्याचे आश्वासन शेतकऱ्यांना देऊनही पाणी सोडण्याचे कारणे काय आहेत तसेच आत्महत्याग्रस्त वसंत पवार यांच्यासह या परिसरातील शेतकऱ्यांनी १३ एप्रिलला आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, त्यानुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :** (१) नाही.

(२) होय.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मृदसंधाराणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३१) ११९८८९ (३१-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

.(१) मृदसंधाराणाच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याच्या अनेक तक्रारी कृषी आयुक्तालयाकडे प्राप्त झाल्याची बाब माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय ,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने संबधित दोंषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४)नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०७-०९-२०१८) :** (१) होय.
(२) व (३) होय.
प्रस्तुत प्रकरणी कृषी आयुक्तालय स्तरावर मा. संचालक ( मृदसंधारण ) , वसुंधरा पाणलोट विकास यंत्रणा पुणे, दक्षता पथक, कृषि आयुक्तालय, पुणे इत्यादि कार्यालय तसेच विभाग/उपविभाग/जिल्हा स्तरावर अनुक्रमे विभागीय कृषी सहसंचालक, उपविभागीय कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कार्यालयास तक्रारी प्राप्त होतात. त्यानुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात येते. प्राप्त तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चौकशी अधिकारी/चौकशी पथक गठीत करुन त्यामध्ये आर्थिक अनियमितता / भ्रष्टाचार अतिप्रदान रक्कम निदर्शनास आल्यास त्यानुसार संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई केली जाते.

त्यानुसार दि. ३१/५/२०१८ अखेर संचालक , मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तलय, पुणे यांना ६४७ तक्रारी प्राप्त झाल्या असून ४८७ तक्रार अर्जावर कार्यवाही सुरु असून आस्थापना कक्षाकडे ३२ तक्रार अर्ज, दक्षता पथकाकडे २२ तक्रार अर्ज,वसुधंरा कक्षाकडे १३ तक्रार अर्ज, एनएचएम कक्षाकडे ४ तक्रार अर्ज पुढील कार्यवाहीसाठी वर्ग करण्यात आले आहेत. तसेच ८९ तक्रार अर्ज निकाली काढले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांंनी एम.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी जादा शुल्क केलेली मागणी**

**(३२) ११९९९१ (०६-०८-२०१८). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने स्थापन केलेल्या शुल्क नियंत्रण समितीच्या शिफारशींना डावलून राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयांनी एम.डी. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी ३५ ते ९० लाख रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यात यावे याबाबतची मागणी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मागणी संदर्भात वैद्यकीय शिक्षण सचिवांनी एप्रिल, २०१८ च्या पहिल्या पंधरवाडयात संस्था चालकांशी तीन दिवस चर्चा केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, संस्थाचालकांच्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१७-११-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयांनी वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता ३५ टक्के संस्थात्मक कोटयाकरिता शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारीत केलेले ३ पट शुल्काऐवजी ५ पट शुल्क आकारण्यास परवानगी देण्याबाबत मागणी केली होती.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पदव्युत्तर वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी खाजगी विनाअनुदानित महाविद्यालयातील एकूण मंजूर प्रवेशक्षमतेपैकी ५०% जागांचे प्रवेश हे शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्कानुसार केले जातात. उर्वरित ५०% संस्थात्मक कोटयापैकी ३५% कोटयासाठी (१५% एन.आर.आय कोटा वगळता) शुल्क नियामक प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या ४ पट शुल्क आकारणे उचित होईल असे दिनांक २४/०४/२०१८ च्या शासन पत्रान्वये शुल्क नियामक प्राधिकरणास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्ह्यातील वैनगंगा नदीवरील कोटगल बॅरेजचे काम सुरू करण्याबाबत**

**(३३) १२०२९० (२०-०७-२०१८). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात वैनगंगा नदीवर कोटगल गावाजवळ कोटगल बॅरेज या सिंचन प्रकल्पास मंजूरी देण्यात आली असून या प्रकल्पाला वित्त विभागाच्या पत्र दिनांक २७ ऑक्टोबर,२०१६ रोजीच्या पत्रान्वये रु.५ लक्ष इतक्या रकमेस मंजूरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,याबाबत गडचिरोली जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत माहे जुलै, २०१७ ते ऑगस्ट २०१७ रोजीपासून सततच्या होणाऱ्या लोकशाही दिनी संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीत सदर प्रश्न चर्चेला आला आहे परंतु यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सिंचन प्रकल्पाकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह कोटगल बॅरेज या सिंचन प्रकल्पास मंजूर निधी तात्काळ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०२-११-२०१८) :** (१) होय.
(२) नाही. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांच्या दि.२९.०७.२०११ च्या पत्रातील अटी नुसार या प्रकल्पाचे बांधकाम सुरु करण्यापूर्वी आवश्यक वैधानिक मान्यता जसे पर्यावरण मान्यता व वन मान्यता घेणे आवश्यक आहे व याकरिता शासनाने सन २०१६-१७ व २०१७-१८

या वर्षामध्ये र.७०.०० लक्ष निधीची तरतूद केली आहे.
(३) आवश्यक वैधानिक मान्यता प्राप्त करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**निम्न साखळी(ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती) प्रकल्पाच्या ४० फूट भिंतीच्या कामामुळे शेतकऱ्यांचे होत असलेले नुकसान**

**(३४) १२०६६९ (२०-०७-२०१८). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव खंडेश्वर (जि. अमरावती) तालुक्यातील निम्न साखळी प्रकल्पाच्या भिंतीचे काम मागील ५ वर्षापासून सुरु असून भिंतीचे कामाकरीता अंदाजे ८०% शासकीय जमीन असून उर्वरीत जमीन शेतकऱ्यांची असून त्यापैकी काही शेतकऱ्यांची जमीन संपादीत केलेली असून प्रकल्पाचे काम सुरु असतांना प्रकल्पबाधीत व इतरही लगतच्या शेतकऱ्यांना भुसंपादनाची कोणतीही माहीती न देता प्रकल्प विभागाने शेतकऱ्यांचे वहिवाट रस्ते बंद केले असून विद्युत पुरवठा खांब तोडुन काम करण्यात येत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर प्रकल्पांवर काम करण्याऱ्या वाहनांच्या डस्टमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान होत असल्याचे लोकप्रतिनिधींनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक २१ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी कळविल्याचे निदर्शनास आले आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-१०-२०१८) :**(१) होय, याबाबत मा.आमदार प्रा.विरेंद्र वा. जगताप यांनी दि. २१/४/२०१८ रोजी कार्यकारी अभियंता, अमरावती पाटबंधारे विभाग, अमरावती यांना निवेदन दिलेले आहे.
(२) मा.लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दि. २१ एप्रिल २०१८ ला लेखी कळवल्याचे या कार्यालयास अवगत नाही. तथापी मा. लोकप्रतिनिधी यांनी विभागीय कार्यालयास दि. २१.०४.२०१८ ला कळविलेले आहे.

कंत्राटदाराचे वाहनांमुळे उन्हाळ्यात काही प्रमाणात धूळ (डस्ट) उडाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यासाठी संबंधित कंत्राटदारास रस्त्यावर पाणी शिंपडून/टाकून काम करण्याबाबत सूचना दिल्या आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही .

---

**मौजे शिंदी, (ता.सिंदखेडराजा , जि.बुलढाणा ) येथे जि.प.अंतर्गत उपविभागीय बांधकाम देऊळगाव राजा अंतर्गत सुरु असलेले पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(३५) १२१०७४ (२४-०७-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिंदी, (ता.सिंदखेडराजा , जि.बुलढाणा ) येथे जि.प.अंतर्गत उपविभागीय बांधकाम देऊळगाव राजा अंतर्गत सुरु असलेले पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याची तक्रार दिनांक ३ एप्रिल,२०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार या कामाची तपासणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार संबधित कंत्राटदार व अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०७/२०१८ रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल. पा.) जि. प. बुलढ़ाणा यांनी तपासणी केली असून काम समाधानकारक आढ़ळून आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना मजुरीच्या दरात वाढ करण्याबाबत**

**(३६) १२११५० (२३-०७-२०१८). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात रोजगार हमी योजनेंतर्गत सध्या २०० पेक्षा जास्त कामे सुरु असून त्यात १० हजारांपेक्षा अधिक मजूर आठ तास काम करुन त्यांना अवघे २०३ रुपये मजुरी मिळत असल्याचे निदर्शनास आले असल्याने मजुरांना मजुरीच्या दरात वाढ करुन द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-१०-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) मग्रारोहयो अंतर्गत मजूरांच्या मजूरीचा दर हा दरवर्षी केंद्र शासनाकडून निश्चित केला

जातो. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी सन २०१८-१९ करिता रु.२०३/- इतका मजूरी दर

निश्चित केलेला आहे. त्यानुसारच मजूरांना मजूरी अदा केली जात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयात चार सिंचन कृषि योजना निधी उपलब्ध करण्याबाबत**

**(३७) १२१३०० (१३-११-२०१८). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयात केंद्र सरकारतर्फे राजीव गांधी सहभागीय सिंचन कृषि विकास योजनेंतर्गत चार सिंचन कृषि योजना निधी अभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निधी उपलब्ध करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१४-११-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) भौगोलिक परिस्थितीमुळे काम पूर्ण करणेस विलंब झालेला आहे. चार कामांपैकी बहुतांशी कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे मार्च २०१९ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अक्कलकुवा तालुक्यातील रामपुर येथील लघुपाटबंधारे योजना अंतर्गत होणा-या बांधकामात शेतक-यांना मोबदला न मिळाल्याबाबत**

**(३८) १२१५३३ (२४-०७-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा तालुक्यातील रामपुर येथील लघु पाटबंधारे योजना अंतर्गत होणा-या बांधकामास स्थानिक आदिवासी शेतक-यांनी तीव्र विरोध दर्शविल्याची घटना दिनांक २८ मे, २०१८ रोजी घडली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांना कोणताही मोबदला न देता मंजूर प्रकल्पाचे कागदोपत्री खोटे संपादन करुन योजनेचे काम सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास,त्यानुसार शेतक-यांना मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२२-१०-२०१८) :**(१) होय.

(२) नाही.
सदर प्रकल्पासाठी भूसंपादन अधिनियम-१८९४ नुसार संपादन प्रक्रिया पूर्ण करुन कलम ११ नुसार दि. २५.०२.२००३ रोजी अंतिम निवाडा घोषित करण्यात आला आहे. त्यानुसार रक्कम भूसंपादन अधिकारी/उपविभागीय अधिकारी तळोदा भाग तळोदा,जि.नंदूरबार, यांना जलसंपदा विभागामार्फत दि.२२.१२.२००३ रोजी रु.५०,२१,२३२/- धनाकर्षाव्दारे अदा करण्यात आली आहे. आतापर्यंत ६३ प्रकल्प बाधित शेतकऱ्यांपैकी ३० शेतकऱ्यांनी अंतिम निवाड्यानुसार जमिनीचा मोबदला स्वीकारला आहे.
(३) संबधीत शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, नंदुरबार, यांना दि.०५.०३.२०१८ व दि.१२.०३.२०१८ रोजी निवेदन दिले. त्यानुसार जिल्हाधिकारी, नंदुरबार, यांनी त्यांचे पत्र क्र कक्ष-१४/पुनर्वसन/कावि/ १४१, दि.१४.०३.२०१८, अन्वये सहाय्यक जिल्हाधिकारी, तळोदा भाग, तळोदा, यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठित करण्याचे आदेश दिले.

चौकशी समितीच्या अहवालानुसार निवेदनातील आरोप चुकीचा असल्याचे अभिप्राय चौकशी समितीने नोंदवला आहे.
(४) अंतिम निवाडयानुसार मोबदला स्वीकारलेल्या प्रकल्प बाधितांपैकी ५ शेतकऱ्यांनी सन २०१५ मध्ये मा.न्यायालय, शहादा, येथे दावा दाखल केलेला होता. दि. १४.०७.२०१८ रोजी मा.लोक अदालत, शहादा, येथे ५ पैकी ४ प्रकल्प बाधितांचे दावे शासनाने तसेच महामंडळाचे पत्र जा.क्र.कासं/भुसं/५६९८/सन-२०१७, दि.०८.१२.२०१७ अन्वये तडजोड करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील डोंगरगाव येथील सिंचन विहीरींची कामे पुर्ण होण्याआधीच काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (सीसी) दिल्याबाबत**

**(३९) १२१५५९ (२३-०७-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील डोंगरगाव येथील सिंचन विहीरींची कामे पुर्ण होण्याआधीच काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (सीसी) दिल्याची बाब दिशा समितीच्या सभेत लोकप्रितिनिधींनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२९-१०-२०१८) :**(१) सदर बाब सिंचन विहीरीच्या नूतन कामाचे नसून ते सिंचन विहीर दुरुस्तीचे काम आहे. सदर सिंचन विहीर दुरुस्तीचे काम पुर्ण होण्याआधीच काम पुर्णत्वाचे प्रमाणपत्र (C.C) दिल्याची बाब खरी आहे.
(२) होय, याबाबत उपजिल्हाधिकारी (रोहयो) यांनी दि.३.८.२०१६ रोजी केलेल्या चौकशीनुसार

सदर प्रकरणी कंत्राटी तांत्रिक अधिकारी (PTO) कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर (CDEO) व शाखा अभियंता जबाबदार असल्याचे दिसून आले. संबंधित कंत्राटी PTO व CDEO यांना यापूर्वीच कामावरुन कमी करण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे प्रकरणी तत्कालीन शाखा अभियंता यांच्याकडून उर्वरित रक्कम वसूल करण्याकरिता गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच लाभार्थ्याला उर्वरित देय रक्कम देण्याकरिता संबंधित कामाचे पूर्णत्वाचे प्रमाणपत्र रद्द करण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अकोला यांना निर्देशित करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जिल्ह्यांचा विकासदर वाढविण्यासाठी केंद्र शासनाने राज्यातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांची केलेली निवड

**(४०) १२१५६८ (०५-११-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्ह्यांचा विकासदर वाढविण्यासाठी केंद्र शासनाने राज्यातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्ह्यांची निवड केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेंतर्गत सदर जिल्ह्यात कोणकोणत्या योजनांची अंमलबजावणी केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०३-११-२०१८) :** (१) होय.

(२) केंद्र शासन व निती आयोगाने "संकल्प से सिध्दी" (Sankalp-se-Siddhi) चळवळ सुरू करण्याबाबत दिलेल्या सूचनांप्रमाणे "District Vision" तयार करण्याबाबत नियोजन विभागाकडून दि.६ ऑक्टोबर, २०१७ च्या परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. नियोजन विभागाकडून जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०१८-१९ तयार करताना तो "District Vision" मध्ये निश्चित केलेली उद्दिष्टे कालमर्यादेत साध्य होण्याच्या दृष्टीने सदर उद्दिष्टांशी सुसंगत असावा, अशीही सूचना यापुर्वी दिलेली आहे.

केंद्र शासनाचे वाणिज्य व उद्योग मंत्रालयाकडून "District Development Initiative" कार्यक्रम हाती घेतल्याचे संदर्भात पत्राद्वारे दिलेल्या सूचनेअनुसार सिंधुदुर्ग व रत्नागिरी या दोन जिल्हयांचा विकास दर वाढविण्याच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग व जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना "प्रस्तावित" "District Development Initiative" या कार्यक्रम बाबत मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाचे वाणिज्य व उद्योग मंत्रालयाकडून निर्गमित होईल या पार्श्वभूमीवर "District Vision" दस्तऐवजाच्या आधारे "District Development Initiative" ची एक रुपरेषा तयार करण्याकरीता निर्देश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद् भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत अंतर्गत करावयाची कामे कार्यान्वित न झाल्याबाबत.**

**(४१) १२२२७१ (२३-०७-२०१८). श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयात गेल्या तीन वर्षात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत सिमेंट नाला बांधकाम कंपार्टमेंट,बंडींग, नाला सरळीकरण, खोलीकरण आदि घेतलेली कामे निविदा न काढल्यामुळे निधी असूनही कार्यान्वित करण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,तुळजापूर तालुक्यात मागेल त्याला शेततळे या योजनेतर्गत कामाचा उद्दीष्टच्या ५० % सुध्दा कामे झालेली नसल्यामूळे यासाठी रु.दीड लाख रुपये अनुदान देण्याची आवश्कता आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार उस्मानाबाद जिल्हयात जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-१०-२०१८) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत: खरे आहे.

उद्दीष्ट पुर्तता करण्याकरीता क्षेत्रीय यंत्रणेला सूचना देण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील सुर्या धरणाचे पाणी इतरत्र न वळविण्याबाबत**

**(४२) १२२६१२ (२०-०७-२०१८). श्री.अमित घोडा (पालघर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुर्या पाणी बचाव संघर्ष समितीने दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्याचे धरणाचे पाणी जिल्हयाबाहेर नेण्यासाठी पाईपलाईनचे सर्वेक्षण आणि ड्रिलिंगचे काम मेढवण आणि सोमटा या गावांच्या हद्दीत सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयातील शेती आणि बागायतीला पुरेसे पाणी मिळत नसल्याने येथे

कायमचे दुष्काळी परिस्थिती असतांना सूर्या धरणाचे पाणी इतरत्र वळविल्यास पालघर वासियांचा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-१०-२०१८) : (**१) होय.

सूर्या पाणी बचाव संघर्ष समितीमार्फत दि. ०३/०४/२०१८ रोजी राजभवन, मुंबई येथे मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांची भेट घेतली. सदर विषयावर मा. राज्यपाल महोदयांकडे दि. ५/८/२०१८ रोजी बैठक झाली.

(२) होय.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत पाईपलाईनचे सर्वेक्षण आणि ड्रिलिंगचे काम मेंढवण आणि सोमटा या गावांच्या हद्दीत सुरु आहे.

(३) पालघर जिल्हा अतिपर्जन्याच्या प्रदेशातील असून सूर्या प्रकल्पातून दरवर्षी सिंचनाच्या अनुषंगाने आवश्यकतेनुसार पाण्याच्या आवर्तन सोडण्यात येते.

सूर्या प्रकल्पातून सन १९८१ ते २०११ या कालवधीत एकूण २२६.९३ दलघमी पाणीसाठा बिगरसिंचनासाठी विविध अभिकरणांसाठी आरक्षित करण्यात आलेला आहे.

सूर्या प्रकल्पातून मंजूर करण्यात आलेल्या बिगर सिंचन पाणी आरक्षणामुळे सूर्या प्रकल्पाच्या प्रस्तावित सुधारीत जलनियोजनानुसार १४६९६ हेक्टर प्रकल्पिय सिंचन क्षमतेपैकी ६६६४ हेक्टर क्षेत्राची कपात करणे अनिवार्य ठरते.

प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रातील लाभार्थींनी संभाव्य कपातीस विरोध केला आहे.

(४) महाराष्ट्र राज्याच्या जलनीतीत पिण्याच्या पाण्यांस प्रथम प्राधान्य असल्याने पिण्यासाठी आरक्षित असलेल्या पाणीसाठ्याच्या अनुषंगाने सिंचन क्षेत्रात कपात करणे अनिवार्य आहे.

तथापि, उक्त प्रकरणी महाराष्ट्र विधीमंडळ पावसाळी अधिवेशन- सन २०१८ मध्ये उपस्थित लक्षवेधी सूचनेवरील निवदेनात मा. मंत्री महोदय यांनी सहा महीन्यांच्या कालावधीत मा. राज्यपाल महोदयांच्या निर्देशानुसार समिती स्थापन करून सूर्या प्रकल्पातील संभाव्य सिंचन कपात व बिगरसिंचन पाणी आरक्षणाच्या प्रश्नावर उपाययोजना प्राप्त करणेबाबत आश्वस्त केले आहे.

सिंचन क्षेत्रामधील प्रस्तावित कपात कमी करणेबाबत विविध उपाययोजना करणेबाबतची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील नरेगा अंतर्गत बेरीस्ते येथील रोजगार हमी योजनेतील**

**मजुरांना मजुरी न मिळाल्याबाबत**

**(४३) १२३५९७ (२३-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील नरेगा अंतर्गत बेरीस्ते येथील १०० लोकांनी काम करुनही सर्व मजुरांना वेतन देण्यात आले नसल्याने त्यांनी याबाबतची तक्रार माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान मोखाडा पंचायत समितीकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच सन २०१७ मध्ये देखील मजुरांना वेतन वेळेवर देण्यात येत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे काय,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नरेगा अंतर्गत पालघर जिल्ह्यातील किती ठिकाणच्या किती मजुरांना वेतन वेळेवर न मिळाल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या आहेत,
(४) असल्यास,उपरोक्त तक्रारीच्या अनुषंगाने मजुरांना वेळेवर वेतन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-१०-२०१८) :**(१) हे अंशत: खरे आहे.
बेरीस्ते ता.मोखाडा येथील ३१ मजुरांना वेळेवर वेतन अदा करण्यास अडचण निर्माण झाली होती. त्यापैकी २४ मजुरांनी मोखाडा पंचायत समितीकडे तक्रार केली होती.
(२) या प्रकरणी मजुरांचे वेतन हे बँकेमध्ये KYC व आधार क्रमांक अद्यावत नसल्यामुळे मजुरांना त्यांची मजुरी अदा करणेस विलंब झाला होता. ग्रामरोजगार सेवकाकडून त्यांचे बँकेचे खाते क्रमांक, आधार क्रमांक व KYC अद्यावत करुन घेऊन ऑनलाईन पध्दतीने पुन:प्रक्रिया करुन सदर मजुरांचे वेतन विलंब शुल्कासह अदा करण्यात आले आहे.
(३) पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यातील बेरीस्ते ग्रामपंचायत वगळता इतरत्र मजुरांना वेतन वेळेवर न मिळाल्याच्या तक्रारी प्राप्त नाहीत.
(४) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मजुरांचे वेतन हे e-fms द्वारे अदा करण्यात येते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**साकुर (ता.जव्हार,जि.पालघर) गावातील रोहयो मजुरांना रोजगार देण्याबाबत**

**(४४) १२३५९८ (२३-०७-२०१८). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साकुर (ता.जव्हार,जि.पालघर) गावी रोहयो मजुरांनी दिनांक २८ मार्च, २०१८ रोजी नमुना क्र. ४ भरुन रोजगार हमीच्या कामांची मागणी तहसीलदार यांच्याकडे केली असताना देखील त्यांना रोजगार मिळू शकलेला नाही,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुसार मजुरांना रोजगार वा बेरोजगार भत्ता देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (०५-११-२०१८) :**(१) हे खरे आहे.

काम मागणी केलेल्या मजुरांना विहीत वेळेत काम उपलब्ध करुन देण्याबाबत प्रयत्न करण्यात आले होते, परंतु तांत्रिक अडचणीमुळे विहीत मुदतीत काम सुरु करता आले नाही.

(२) तांत्रिक अडचण दुर झाल्यानंतर ताबडतोब काम सुरु करुन काम मागणी केलेल्या मजुरांना काम उपलब्ध करुन देण्यात आले.

(३) काम मागणी केलेल्या मजुरांना काम उपलब्ध करुन देण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लघू पाटबंधारे विभाग, हरीपुरा (ता.यावल,जि.जळगांव) या योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी मिळण्याबाबत**

**(४५) १२३८०० (२४-०७-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघू पाटबंधारे विभाग, हरीपुरा (ता.यावल,जि.जळगांव) या योजनेस तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता व निधी मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावास मान्यता देऊन आवश्यक असलेला निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६ फेब्रुवारी,२०१८ रोजी वा त्यासुमारास मा.जलसंपदा मंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८)** :(१) नाही.

(२) होय, निवेदन प्राप्त आहे.

(३) तापी पाटबंधारे विकास महामंडळाच्या दि. २७.०७.२०१२ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आलेला सु.प्र.मा. प्रस्ताव प्रकल्पाची किंमत रु. २५.०० कोटी पेक्षा जास्त असल्याने शासनाच्या निर्देशानुसार राज्य तांत्रिक सल्लागार समितीस सादर करण्यात आला आहे. राज्य तांत्रिक सल्लागार समितीच्या सहमतीनंतर सदर प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**मोहजा रोड (ता.रिसोड,जि.वाशिम) येथील १६ शेतक-यांच्या शेत वहिवाटीचे रस्ते सावरगाव जिरे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेल्याबाबत**

**(४६) १२४९१२ (२४-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहजा रोड (ता.रिसोड, जि.वाशिम) येथील १६ शेतक-यांच्या शेत वहिवाटीचे रस्ते चार वर्षापूर्वी उभारलेल्या सावरगाव जिरे प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेल्याने शेतक-यांना शेतीत ये-जा करण्यासाठी गैरसोय होत असल्याचे माहे जुन, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लघुपाटबंधारे विभागाच्या वतीने चार वर्षापूर्वी सावरगांव जिरे धरणाची उभारणी करण्यात आली या धरणासाठी काही शेतक-यांच्या जमीन अधिग्रहीत करण्यात आल्या मोहजा रोड शिवारातील शेतक-यांचे शेतरस्तेही या प्रकल्पाच्या बुडीत गेले आहेत,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार शेतकऱ्यांना शेत वहिवाटीसाठी रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८) :** (१) सावरगांव जिरे (ता.जि.वाशिम) हा प्रकल्प चार वर्षापूर्वी उभारलेला नसून सदर प्रकल्पाचे काम सन २००५ मध्ये पूर्ण झालेले आहे.

(२) या प्रकल्पाकरिता काही शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या आहेत.

(३) शेतक-यांच्या शेत वहीवाटीचे रस्ते प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेल्यामुळे शेतक-यांना शेतात ये-जा करण्यासाठी गैरसोय होत असल्याचा शेतक-यांचा दिनांक २०.०७.२०१६ रोजीचा अर्ज व आपले सरकार पोर्टलवर तक्रारी प्राप्त आहेत.

शासनाचे धोरणानुसार प्रकल्पाचे खर्चाने वहिवाटीच्या रस्त्याकरता भूसंपादन करण्याची

तरतूद नाही. तथापि, सदरहू रस्त्याकरिता आवश्यक जमीन शेतक-यांनी दानपत्राद्वारे दिल्यास रस्ता करुन देणेबाबत कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्म गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेतून मंजुर झालेल्या विहीरींच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(४७) १२४९२३ (२३-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी ग्रामिण रोजगार हमी योजनेतून मंजुर झालेल्या विहीरींचे काम करुनही लाभार्थ्यांना अनुदान मिळत नसून सदर कामात गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जुन, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) तसेच रोजगार हमी योजनेच्या कामात चांदवड (ता.चांदवड,जि.नाशिक) येथेही जवळपास १८०० कामांना मंजुरी देतांना लाभार्थ्याकडून प्रत्येकी दहा हजार रुपये घेवून गैरव्यवहार झाल्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी तक्रार दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (३०-१०-२०१८) :**(१) हे खरे नाही.
सदर कामात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. नाशिक जिल्ह्यात ७१३३ सिंचन विहीरींची कामे सुरु करण्यात आलेली असुन त्यापैकी अद्यापपावेतो ५१७० सिंचन विहीरींची कामे पूर्ण करण्यात आलेली आहे. सुरु कामांच्या तुलनेत पूर्ण झालेल्या कामांची टक्केवारी ७२.४८ टक्के एवढी आहे. सद्यस्थितीत १५६७ एवढ्या अपूर्ण सिंचन विहीरी आहेत. ४३७ सिंचन विहीरी भौतिक दृष्ट्या पूर्ण असून त्या संबंधित कुशल रक्कमेचे FTO ऑनलाईन करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे नाही.
सदर कामात गैरव्यवहार झाल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनीधीकडून प्राप्त झालेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लिंगायत जातीला वाणी जातीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा**

### ओबीसी प्रवर्गामध्ये समावेश करून घेण्याबाबत

**(४८) १२५२८२ (२०-०७-२०१८). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लिंगायत शब्द प्रयोग केल्यामुळे एकाच प्रवर्गातील शाब्दिक स्वरूपाच्या लिखित स्वरूपामध्ये दोन जाती निर्माण झाल्या असून प्रत्यक्षात मात्र वाणी व लिंगायत या एकच जाती आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लिंगायत जातीला वाणी जातीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा ओबीसी प्रवर्गामध्ये समावेश करून घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (उदगीर) शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीनुसार लिंगायत जातीला वाणी जातीचे प्रमाणपत्र देऊन त्यांचा समावेश ओबीसी प्रवर्गात करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (१३-११-२०१८) :**(१) नाही.

(२) होय.

(३) व (४) इतर मागास वर्गातील यादीतील अ.क्र.१९० वर लिंगायत वाणी अशी नोंद आहे, लिंगायत हा धर्मपंथ आहे कार्याच्या किंवा पंथाच्या आधारावर आरक्षण देण्याची मागणी मागासवर्ग आयोगाने अहवाल क्र.४७ नूसार अमान्य केली आहे.

---

### चासकमान प्रकल्पातील (ता.खेड,जि.पुणे) संपादित केलेल्या अतिरिक्त जमिनींबाबत

**(४९) १२५३३८ (२४-०७-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान प्रकल्पातील (ता.खेड,जि.पुणे) मौजे बिबी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी सन १९८६ साली गाभा भराव व कवच भरावासाठी संपादित करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाभा भराव व कवच भरावाची कामे पूर्ण झालेली असून संपादित केलेल्या काही जमिनी या धरणाच्या उच्चतम पाणी पातळीच्या बाहेर असून धरणाचे पाणी १०० % साठा होवूनही या जमिनींपर्यंत पाणी पातळी येत नसल्याने अशा सर्व जमिनींची सक्षम अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करून त्याचा सविस्तर अहवाल तयार करण्यात यावा अशी लेखी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास कार्यकारी अभियंता,पुणे यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,सदर मागणीच्या अनुषंगाने उक्त जमिनींची पाहणी केली आहे काय व त्यानुसार

अशा अतिरिक्त विनावापर जमिनी मुळ मालकांना परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-१०-२०१८)** :(१) होय.
(२) होय.
(३) सदर जमिनी भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादित करण्यात आल्या असून त्यामध्ये संपादित केलेल्या जमिनी मूळ मालकास परत करणेबाबत कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे अद्यापपर्यंत सदर जमिनी मूळ मालकास परत करण्यात आलेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही

---

**गोसेखुर्द प्रकल्पाच्या कालव्यावर कालव्याच्या कामांबाबत**

**(५०) १२५४६६ (२४-०७-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर अंतर्गत कार्यकारी अभियंता भंडारा पाटबंधारे विभागाद्वारे पेंचप्रकल्पाच्या व गोसेखुर्द प्रकल्पाच्या कालव्यावर कालवे दुरुस्ती, लाईनिंगचे कामे, मुरूमाची कामे, कांक्रिटची कामे तसेच रीशेक्सनिंगची कोट्यवधीची कामे व लघुपाटबंधारे विभाग, नागपुर (नागपुर पाटबंधारे विभाग, (दक्षिण) नागपुर) व पेंच पाटबंधारे विभाग, नागपुर (भु व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, नागपुर) अंतर्गत सन २००८ ते २०१४ च्या आर्थिक वर्षात एम.डब्लु.एस.आय.पी वर्ल्ड बँकेच्या निधीतून सुमारे ३२५ कोटी रूपयाचे व विशेष दुरूस्ती नविनीकरण कामासाठी सुमारे ८० कोटी रूपयाची कालवे दुरूस्ती, लाईनिंगचे कामे, मुरूमाची कामे, कांक्रिटची कामे तसेच रीशेक्सनिंगची कामे कंत्राटदार एजन्सीमार्फत करण्यात आलेली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,सदर कामामध्ये बनावट एम.बी. देयके तयार करणे, कामे न करताच देयके घेवून गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी, कंत्राटदाराविरूद्ध अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नागपुर यांना गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत दिनांक २७ ऑक्टोबर,२०१४ व दिनांक २९ मे,२०१५ तसेच मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर,२०१७ रोजी लोकप्रतिनिधींनी तक्रार केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अधिक्षक अभियंता व परीमंडळ अधिकारी दक्षता पथक (नागपुर परीमंडळ) जलसंपदा विभाग, नागपुर यांना दिनांक ७ व २७ जून,२०१६, दिनांक २३ नोव्हेंबर,२०१६ व दिनांक १४ डिसेंबर,२०१६ रोेजी वारंवार तक्रार देवूनही प्रकरणाची चौकशी वा कारवाई अद्यापर्यंत न करणे, चौकशी प्रलंबित असणे याबाबत दिनांक १९ डिसेंबर,२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी तक्रार दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाचे कार्यासन अधिकारी, जलसंपदा विभाग यांचे पत्र क्र.

२०१८/(२९/०११८)/दक्षता-३ दि.०१/०२/२०१८ रोजी अधीक्षक अभियंता दक्षता पथक नागपूर यांना चौकशीचे निर्देश देण्यात आले त्यानुसार प्रकरणाची चौकशी करुन चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे काय व त्यानुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१४-११-२०१८) :** (१) व (२) होय.

(३) दक्षता पथक परिमंडळ, नागपूर यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

(४) दक्षता पथक परिमंडळ, नागपूर यांचे मार्फत चौकशी सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.